जय लहुजा !



नोंदणी क्र. महा.५८९/२०१७

**सत्यशोधक आण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठान (महाराष्ट्र राज्य)**

संस्थापक अध्यक्ष **मा.श्री.नामदेवराव चांदणे**

(लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार महाराष्ट्र शासन मुंबई - २०१३)

मुख्यकार्यालय : आण्णाभाऊ साठे नगर, वडगांव गुप्ता, ता.जि.अहमदनगर मो. ९२७००४३६९६

जय लहु



दि. 13/3/202

O.C. -

प्रति,

**मा. जिल्हाधिकारी साहेब,**

**अहिल्यानगर**

(सत्यशोधक आण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठान, नों.क्र.महा/५८९/२०१७, मु.पो.वडगांव गुप्ता, ता.जि.अहमदनगर)

यांना सविनय सादर...

**विषय** - शिरसगांव ते वरखेड रस्ता त्वरीत दुरुस्त करणेत यावा, अन्यथा बुधवार दि. ०१/०४/२०२६ रोजी रस्ता रोको.

महोदय,

शिरसगांव ते वरखेड, ता. नेवासा, जि अहिल्यानगर रस्ता अत्यंत खराब आहे. मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. टु व्हीलर, पायी चालणारे भक्त भावीक रस्त्यावरुन चालताना आपला जीव मुठीत घेऊन चालत असतात. अपघात केव्हापण होऊ शकतो.

दुसरे महत्वाचे की, वरखेड, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथे वरखेड देवी यात्रा हनुमंत जयंतीपासून चालु होते. आणि सोमवार दि. ०६/०४/२०२६ रोजी रात्री ८ वा. होम आहे व दि. ०७/०४/२०२६ रोजी मुख्य यात्रा आहे. आणि या दिवशी ११ वा. पैठणची मानाची पालखी वरखेड गावात येते ही पालखी जुगा बाबा पोतराज, वांबोरी येथुन निघते. पैठणला मुक्कामी राहुन वरखेड गावात येते.

वरखेड देवी महाराष्ट्रातील मातंग समाजाचे कुलदैवत आहे. ही देवी नवसाला पावणारी आहे म्हणून जगप्रसिद्ध आहे. या वरखेड देवी यात्रेत सर्व जातीधर्माचे भावीक दर्शनासाठी येतात. यात्रेत ९० टक्के मातंग समाज उपस्थित असतो. ह्या यात्रेत ५ ते ६ लाख भावीक दर्शनासाठी येतात. आणि मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापुर, सांगली, अहिल्यानगर, नाशिक, सुरत, धुळे, जळगांव, औरंगाबाद अशा अनेक जिल्ह्यातुन भावीक रिक्षा, तीन चाकी वाहन, चारचाकी वाहन, टेम्पो, ट्रक व एस.टी. बस मधुन भावीक दर्शनासाठी वरखेड गावी येतात.

(महसूल शाखा, आवक टपाल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, दिनांक 13/03/2026)

बाहेर गावावरुन येणा-या भावीकांना वरखेड गावात जागा मिळत नाही. परंतु येथील ग्रामस्थ व शेतकरी आपल्या जागेत तार कंपाऊंड केले आहे. येथे जागा २००० ते ५०० रुपये पर्यंत भाडे आकारतात, त्यामुळे भावीकांची लुट केली जाते.

तरी मा. साहेबांनी (प्रशासनाने) जागेवर प्रतिबंध घालून भावीकाचे भाडे नियमीत आकारण्यात यावे असे सहकार्य करावे.

त्याचप्रमाणे उपअभियंता साहेब सार्वजनिक बांधकाम विभाग, नेवासा यांना शिरसगांव ते वरखेड रस्ता दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात यावेत व भावीकांना सुरक्षीत ठेवण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा बुधवार दिनांक ०१/०४/२०२६ रोजी दुपारी १२ वाजता खडका फाटा, नेवासा येथे श्री. नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक आण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठान व वरखेड गावातील ग्रामस्थ व अनेक संघटना यांचेतर्फे रस्ता रोको करण्यात येणार आहे. होणा-या सर्व परिणामाची सर्वस्वी जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग, नेवासा यांची राहील याची नोंद घ्यावी.

आपले नम्र,

K Londhe
**श्री. कडुबाबा लोंढे**
पुरस्कार प्राप्त

S.B Sakat
**श्री. सुनिल सकट**
पुरस्कार प्राप्त

**श्री. नामदेवराव चांदणे**
अध्यक्ष

S.S Shelar
**श्री. संतोष शेलार**
पुरस्कार प्राप्त

अशोक भोसले
**श्री. अशोक भोसले**

Lakhan
**श्री. लखन साळवे**

हिराबाई गोरखे
**हिराबाई गोरखे**
पुरस्कार प्राप्त

दत्तु गोरखे
**श्री. दत्तु गोरखे**

**श्री. निलेश चांदणे**

R Alhat
**श्री. राजु आल्हाट**
सामाजिक कार्यकर्ते

रामदास साळवे
**श्री. रामदास साळवे**
सामाजिक कार्यकर्ते

Laxman
**श्री. लक्ष्मण साबळे**
सामाजिक कार्यकर्ते

बंडु पाडळे

पोपट भोसले

प्रत माहितीसाठी-

१) मा. जिल्हापोलीस अधिक्षक, अहिल्यानगर

२) मा. कार्यकारी अभियंता, ए.जी.एस. सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहिल्यानगर

३) मा. उपअभियंता साहेब, नेवासा

४) मा. तहसिलदार साहेब, नेवासा,

५) मा. पोलीस निरीक्षक, नेवासा, पो.स्टे. अहिल्यानगर

६) मा. ग्रामसेवक - सरपंच, ग्रामपंचायत वरखेड

PDS
१३/०३/२०२६
**आवक लिपीक**
**सा. बां. मंडळ, अहिल्यानगर**